# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 11 February 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ११ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

********

- देशाच्या सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेत गेल्या दहा वर्षात ३२ पटीने वाढ झाल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- सामाजिक संपर्क माध्यमांवरच्या कार्यक्रमांसाठी नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी करण्याची राष्ट्रीय महिला आयोगाची सूचना
- दहावी तसंच बारावीच्या परीक्षांमध्ये सामूहिक कॉपीच्या घटनांवर कडक कारवाईचे मुख्यमंत्र्यांचे आदेश–बारावीच्या परीक्षेला प्रारंभ

आणि

- ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा रं बोराडे यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार

********

गेल्या दहा वर्षात देशाची सौर ऊर्जा उत्पादन क्षमतेत ३२ पट वाढ झाल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भारत ऊर्जा सप्ताह २०२५ चं पंतप्रधानांनी दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते. भारत फक्त स्वतःच्या विकासालाच नव्हे तर जगाच्या विकासालाही चालना देत असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं, ते म्हणाले –

> ***दुनिया का हर एक्सपर्ट आज कह रहा है, की ट्वेंटी फर्स्ट सेंच्युरी भारत की सेंच्युरी है। भारत अपनी ही नही, दुनिया की ग्रोथ को भी ड्राईव्ह कर रहा है। और इसमें हमारी एनर्जी सेक्टर की बहोत बडी भूमिका है।***

ऑक्टोबर २०२५ पूर्वीच इंधनात २० टक्के इथेनॉल मिश्रणाचं उद्दीष्ट साध्य करण्याच्या मार्गावर भारत अग्रेसर असल्याची माहिती पंतप्रधानांनी दिली, ते म्हणाले –

***आज भारत 19% इथेनॉल ब्लँडींग कर रहा है। इससे फॉरेन एक्सचेंज की सेव्हिंग हुई है। और सबस्टेंशियल फार्मर रेव्हेन्यू जनरेट हुआ है। हम ऑक्टोबर 2025 से पहले ही 20% इथेनॉल मॅनडेट अचिव्ह करने की राह पर है।***

दरम्यान, भारत ऊर्जा सप्ताह हा जागतिक स्तरावरील दुसऱ्या क्रमांकाचा हा सर्वात मोठा ऊर्जा कार्यक्रम आहे. या सप्ताहात देशातली यशस्वी प्रधानमंत्री उज्ज्वला योजना ही जागतिक स्तरावर स्वीकारार्ह आदर्श योजना म्हणून सादर केली जाईल. या सप्ताहात कॅनडा, जर्मनी, जपान, अमेरिका आणि इंग्लंड या देशांचीही दालनं असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

सामाजिक संपर्क माध्यमांवरच्या कार्यक्रमांसाठी नियमावली आखून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याची सूचना राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाला केली आहे. यूट्यूबर रणवीर अलाहाबादिया याने केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्य प्रकरणी रहाटकर यांनी वृत्तसंस्थेशी बोलतांना ही माहिती दिली. अलाहाबादिया यांच्या वक्तव्याची आयोगानं गांभीर्याने दखल घेतल्याचं रहाटकर यांनी सांगितलं. त्या म्हणाल्या –

***जो भाषा वहां पर युज की गई है, वो बहेत खराब भाषा है। इस भाषा का इस तरीके ऐसा उपयोग नही होना चाहीये। इस विषय मे कमिशन बहोत गंभीर है। और हमने आय टी मिनिस्टर को लिखा है, की ऐसे जो प्लॅटफॉर्म है, इस प्लॅटफॉर्म्स के लिये कुछ नियमावली और अच्छी तरीके से होनी चाहीये। और ऐसे नियमावली के माध्यम से इनको कंट्रोल करना जरूरी है।***

****

राज्यातील दहावी तसंच बारावीच्या परीक्षांमध्ये सामूहिक कॉपीच्या घटनांवर कडक कारवाई करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांना दिले आहेत. आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अशा केंद्रांची मान्यता कायमस्वरूपी रद्द करावी तसेच कॉपीस मदत करणाऱ्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना थेट सेवेतून बडतर्फ करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. परीक्षेच्या पारदर्शकतेसाठी कडक उपाययोजना जाहीर करण्यात आल्या. यामध्ये परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात अनधिकृत व्यक्तींना प्रवेशबंदी, विद्यार्थ्यांना कोणतेही साहित्य बाळगण्यास मनाई, भरारी पथकाद्वारे कडक निरीक्षण, संवेदनशील केंद्रांवर ड्रोन तसंच व्हिडिओ कॅमेऱ्यांद्वारे नजर ठेवणं, आदी उपायांचा समावेश आहे.

महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नियम, २०१९ मध्ये दुरूस्ती करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या रचनेनुसार राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामध्ये अध्यक्ष आणि नऊ सदस्य असतील.

पुणे जिल्ह्यातील विविध उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरित करणं, वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रासाठी सुमारे ७० दश लक्ष घनमीटर पाणीसाठा पिण्यासाठी आरक्षित करणं, तसंच पालघर जिल्ह्यातील देहरजी मध्यम पाटबंधारे प्रकल्पाला खर्चमान्यता आदी निर्णयही आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आले.

दरम्यान, मुंबईमधील वांद्रे कुर्ला संकुलात भरवण्यात आलेल्या "महालक्ष्मी सरस" विक्री आणि प्रदर्शनाचं उद्घाटन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. सध्या राज्यात १८ लाख लखपती दीदी असून मार्चपर्यंत पंचवीस लाख लखपती दीदी करणार आहोत, तसंच 'उमेद'च्या माध्यमातून राज्यभरातील बचत गटांना हक्काचं विक्रीचं साधन उपलब्ध व्हावं ,यासाठी प्रायोगिक तत्त्वावर दहा जिल्ह्यात दहा मॉल तयार करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.

****

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात झाली. या परीक्षेसाठी १५ लाख पाच हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असल्याची माहिती मंडळानं दिली आहे.

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज शहरात देवगिरी महाविद्यालयातल्या परीक्षा केंद्रास भेट देऊन पाहणी केली.

नांदेड जिल्ह्यात इंग्रजीच्या परीक्षेला आज ९४८ विद्यार्थी अनुपस्थित राहिले. एकूण ४१ हजार ८९८ पैकी ४० हजार ९५० विद्यार्थ्यांनी परीक्षेला हजेरी लावल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

लातूर इथं अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीनं १२ वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा देत आत्मविश्वासाने परीक्षा देण्याचा संदेश देण्यात आला.

****

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा रं बोराडे यांच्या पार्थिव देहावर आज छत्रपती संभाजीनगर इथं शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. बोराडे यांचं आज छत्रपती संभाजीनगर इथं वृद्धापकाळाने निधन झालं, ते ८५ वर्षांचे होते. अध्यापन क्षेत्रात कार्यरत असलेले बोराडे यांचा ‘पेरणी’ हा पहिला कथासंग्रह १९६२ साली पुण्याच्या कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने प्रसिद्ध केला होता. त्यांची ‘पाचोळा’ ही कादंबरी विशेष गाजली. याशिवाय ‘तलफ’, ‘बुरूज’, यांसारख्या अत्यंत वेगळ्या धाटणीच्या कथाही त्यांनी लिहिल्या. ग्रामीण भागातल्या गरीब सर्वसामान्य माणसाला त्यांनी आपल्या कथांमधून जिवंत केलं. त्यांच्या कथांमधली पात्रं ठसठशीतपणे वाचकांच्या समोर येतात. त्यांच्या कादंबऱ्यांवरचे चित्रपटही प्रसिद्ध झाले आहेत.

पाचोळा या कादंबरीसाठी तसंच मळणी या कथासंग्रहासाठी महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आलं होतं. राज्य शासनाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ही नुकताच बोराडे यांना जाहीर झाला होता.

बोराडे यांच्या निधनाबद्दल साहित्य आणि शिक्षण क्षेत्रासह समाजाच्या सर्वच स्तरातून दु:ख व्यक्त होत आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ छाया महाजन यांनी बोराडे यांना या शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली –

> ***ग्रामीण साहित्यातले उत्कृष्ट लेखक म्हणून बोराडे सरांचं नाव प्रामुख्याने घेतलं जातं. त्यांची पाचोळा फार सुंदर कांदबरी. पण मी जेव्हा आमदार सौभाग्यवती पाहिला त्यांचा, तेव्हा मला वाटलं की सरानां प्रत्येक क्षेत्रामध्ये रुची आहे. आणि त्याचा अभ्यास करून त्या पद्धतीनं त्यानं ते लिहिलेलं आहे. त्यांनी शिवार पुरस्कार दिले.***

***लेखकाला प्रोत्साहन द्यायचे. साहित्य क्षेत्राची खऱ्या अर्थाने हानी झाली असं मी निश्चित म्हणेल. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.***

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोराडे यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. ग्रामीण साहित्य चळवळीचा बिनीचा शिलेदार हरपला, असं त्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी बोराडे यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगरच्या डॉ.यशश्री करमाळकर यांची चेन टू बॉलीवूड या गायनाच्या रिएॅलिटी शो मध्ये पहिल्या पाच विजेत्यांत निवड झाली, त्यांना हॉलिवूडच्या सिक्स्टीन स्ट्रीट प्रॉडक्शन चे पारितोषिक प्राप्त दिग्दर्शक विजय कुमार मिरचंदानी यांनी, त्यांच्या आगामी हॉलिवूड चित्रपटासाठी पार्श्वगायन करण्याची संधी दिली आहे.

****

वृक्षारोपण आणि संवर्धन ही सामाजिक जबाबदारी असल्याचं, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी म्हटलं आहे. आज छत्रपती संभाजीनगर इथं सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीनं घेण्यात आलेल्या, वृक्ष उत्पादक आणि वृक्ष खरेदीदार मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते. बांबू आणि चंदनासह फळबागांचं अर्थशास्त्र समजून घेण्याची गरज जिल्हाधिकारी स्वामी यांनी व्यक्त केली. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि हिंगोली या चार जिल्ह्यातील वृक्ष उत्पादक आणि वृक्ष खरेदीदार या मेळाव्यात सहभागी झाले होते.

****